# भारतीय गुलामगिरीचे स्वरूप

*डॉ. हरी नारायण जमाले

मानवी समाज रानटी व भटक्या अवस्थेत असताना प्रत्येक व्यक्ती आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्वंयपूर्ण असे. त्या व्यक्तीला स्वत: पुरते अन्न मिळवणे त्या काळात सहज शक्य होते. पुढे मानवी समाज भटक्या स्वरुपात स्थिर होऊन शेती करु लागला अडचणीच्या काळात खाण्यासाठी अन्न मिळावे म्हणून मानवाने धान्य साठवून ठेवण्यासाठी सुरुवात केली. हे अतिरिक्त धानोत्पादन मिळविण्यासाठी अधिक भूभाग शेतीयोग्य बनवून जास्तीचे श्रम करण्याची आवश्यकता होती.शेतीसाठी स्थिर झालेल्या टोळयात आपसात संघर्ष होऊ लागले पराभूत टोळीतील पकडले गेलेले युध्दांत जीवत राहिलेले सैनिक व त्यांचे कुटूंबीय जिकंलेल्या टोळीच्या वर्चस्वाखाली आल्यानंतर त्याच्याशी कठोर व्यवहार केले जाऊ लागला. त्यानंतर ठार मारण्यापेक्षा त्याच्या श्रमबळाचा उपयोग अतिरिक्त धानोत्पादन करण्यासाठी फायदेशिर ठरे. या भूमिकेतून त्यांच्याकडून शेतीची मशागत करुन घेण्यात आली. गुलामावर मालकाचा पूर्ण अधिकार असून त्यांना गुराप्रमाणे वागविले जात असे.

**ताम्रपाषाणकालीन गुलामगिरी:-** ‘मोहोजोदारो येथे भव्य धान्य कोठारा शेजारी असणा-या बारीक-सारिक दिसणा-या लहान-लहान झोपडी वजा खोल्याच्या रांगा म्हणजे गुलामांची किंवा मजुरांची वस्ती असावी.’ हे मत इतिहासात संशोधक देवराज चनाना हे मांडतात.[१] मोहोजोदारोच्या सार्वजनिक स्नानगृहात तलावात मातृदेवतांचे प्रतिनिधित्व करणा-या देवदासी दर्जाच्या स्त्रिा जलक्रिडा करित असत. आणि नगरातील प्रतिष्ठित वीर पुरुष या स्त्रियाशी संभोग करीत असत या स्त्रि कोणा एका पुरुषासोबत विवाह करुन सामान्य जीवन जगु शकत नसाव्यात.[२] असा सिध्दांत डॉ. डी.डी.कोसंबी या साम्यवादी इतिहासकारानी मांडला असून हि प्रथा सुमारे बॉबीलोनियाच्या ईश्वराच्या मंदिरात सुध्दा प्रचलित होती असे म्हटले आहे.[३]

**वैदिक कालिन दासप्रथा:-** वैदिक कालखंडाच्या सुरुवातीस अर्थव्यवस्था मुख्यत: पशुधनावर आधारित असल्याने अतिरिक्त धानोत्पादन व अतिरिक्त श्रमाची आवश्यकताच नव्हती म्हणून गुलामांची सुध्दा निकड नसावी. दस्यू वर लादलेली गुलामगिरी केवळ सेवाचाकरी याच स्वरुपाची असावी. वर्णव्यवस्था उदयास आल्यानंतर पुढे हेच दस्यू शुद्र म्हणून ओळखले गेले परंतु या काळातील वर्णव्यवस्था हि कर्मावर आधारित होती. आई-वडील ब्राहमण नसतानाही वरीष्ठ ब्राहमण होते. ऋग्वेदात फक्त एकाच ठिकाणी पुरुष सुक्तांत शुद्राचा उल्लेख आढळतो पण विद्वानाच्या मते हा नंतरचा भाग आहे.[४]

**महाकाव्य काळातील गुलामगिरी:-** महाकाव्याच्या काळात वर्ग, वर्ण या संस्था स्थिरावल्या सेवकांची गरज जास्त प्रमाणात भासू लागली या दासावर मालकाची पूर्ण सत्ता चालू लागली त्याच्या मालमत्तेवर व बायका मुलावर सुध्दा मालकाचा अधिकार प्राप्त झाला त्या काळी दासीपुत्र क्रितदास, युध्दास, द्वितदास असे अनेक दासाचे प्रकार होते.[५] बौध्द काळातही काही गुलामगिरीचे उल्लेख सापडतात. या काळात स्त्रि गुलामांचे काही पुरावे आहे. त्यामध्ये कुलदासी, नटीदासी, देवदासी, वन्यदासी, कुभंदासी, वाहिटीकादासी, यख्यदासी असे विविध प्रकारच्या स्त्रि दासांचा उल्लेख सापडतो.[६]

**स्मृति वाड:मयातील गुलामगिरीचे स्वरुप:-** नारदस्मृतीत दासांचे पंधरा प्रकार सांगितलेले आहे. काही प्रकारचे दास बदली मनुष्य देऊन किंवा नुकसान भरपाई देऊन स्वत:ची मुक्तता करु शकत. उच्च जातिचा मनुष्य कनिष्ठ जातीच्या व्यक्तीचा गुलाम होउ शकत असे तसेच चोरांनी पळवून नेलेला किवां जबरदस्तीने दास्यात ठेवलेला व्यक्ति गुलाम मानला जात नसे. दासी पुत्राला सुध्दा औरस पुत्राप्रमाणे काही वारसा हक्क मिळत असत. ७ गुप्तकालीन समाजात हि गुलामगिरी असावी असे पुरावे आहे गुप्त काळात समाजात गुलामाच्या सोळा श्रेण्या असाव्यात जुगारी, कर्जबाजारी व दिवाळखोर लोकांचा यात जास्त प्रमाणात समावेश होता. हे लोक मास भक्षण करु लागल्यावर त्यांना समाजातुन बहिष्कृत केले गेले.[८]

**मौर्यकालिन गुलामगिरी:-** मौर्यकाळातही वंशपंरपरेने व इतर कारणाने गुलामगिरी निर्माण झालेली होती. मौर्यकाळातील दास म्हणजेच आमरणदास परंतू दुदैवाने आर्थिक दुरावस्था आल्यास काही प्रतिष्ठीत ‘आर्य’ लोक सुध्दा गुलाम म्हणुन काम करित त्याची आर्थिक परिस्थिती पूर्ववत सुव्यवथित झाल्यास ते पुन्हा प्रतिष्ठित म्हणून वावरु शकत हे तात्पूरते दास होते.[९] कौटिल्याने ध्वज आहात उदारदास, अहितक, (गहान ठेवलेले) व आत्मव्रिकमी असे दासाचे नऊ प्रकार सांगितले आहे. तसेच त्याची खरेदी-विक्री सुध्दा होत नसावी. दास प्रथा हि केवळ उत्पादन प्रक्रियेचे माध्यम म्हणून समाजात स्थिर होऊ लागली.[१०]

**मध्ययुगीन भारतातील गुलामगिरीचे स्वरुप:-**

मध्ययुगातही अरब व तुरकाने या गुलामगिरीचा अवलंब केला. अरबस्थानांत मुस्लिम धर्माचा उदय झाल्यानंतर गुलामगिरी हे मुस्लिम समाजाचे वैशिष्टये झाले आहे. मुस्लिम काळात बाळगलेल्या गुलामाच्या संख्यवरुन एखादयाची श्रीमंत अधिकार आणि ऐश्वर्य ठरविले जात असे.म्हणून सामान्य सरदारापासून तर सुलतानापर्यतच्या अधिकारी वर्गात गुलाम बाळगण्याची हौस होती. फिरोज तुगलक गुलामांना महिन्याचे १०-१०० टंक वेतन देत होता परंतु साधारण वर्गातील

* प्राचार्य, राजर्षी शाहू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाथ्री फुलंब्री, औरंगाबाद

लोकासाठी गुलामांना पगार देण्याची आवश्यकता नव्हती. केवळ गुलामाच्या प्राथमिक गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून ही अपेक्षा होती.महम्मद तुगलकाच्या काळात एका गुलामाला प्रति वर्षी कपडयाचे चार जोड, १२० टंक, दर महिन्याला २ मन गहू किंवा तादूळ तसेच दररोज ३ शेर मटन इतर आवश्यक वस्तु दिल्या जात होत्या. म्हणजे गुलामांना सुविधा मिळत असे.[११]मध्यकालिन काळात १००-२०० टंक किंमत मोजून गुलाम खरेदी केल्याची उदाहरणे आहेत. परंतु अपूर्ण किंवा नविन गुलाम २० टंक किमतीला विकत मिळत असे. गुलाम म्हणून विकाल्या जाणा-या मुलीची किंमत त्याच्या कार्यक्षमतेवर किंवा सौदर्यावर मुलीची किंमत ४० टंक इतकी होती. काही विशेष अपवादात्मक सौदर्यवान गुलाम मुलीची किमत २०० टंक, २००० टंक असल्याची उदाहरणे आहेत. गुलामाची खरेदी काही वेळा दिनार नावाच्या सोन्याच्या नाणाने केली जात असे. मलिककापूर हा १००० दिनारी गुलाम होता. अमीर खुसरोने मध्ययुगीन गुलामगिरीचे 'इजाझ-इ-खुश्रती' मध्ये सखोल वर्णन करतो. मध्ययुगीन महाराष्ट्रात तसेच पेशवे काळात हि गुलामगिरी अस्तित्वात होती. गुलाम स्त्रिस कुनबी म्हणत असत. गुलामाना खाजगी मालमत्ता समजली जात असून त्यांची खरेदी-व्रिकी करण्याचे सर्व अधिकार धन्यास होते. गुलामाच्या खरेदी-व्रिकीवर शासनाचे कडक नियंत्रण होते. क्वचीत प्रंसगी दास –दासींना गहान ठेऊन कर्ज दिल्या घेतल्याची उदाहरणे आढळतात.[१२] मराठे कालीन संदर्भ साधनामध्येही पेशवाईतील गुलामगिरी विषयी भरपूर संदर्भ मिळतात. पेशवाईत गुलामाचे जे उल्लेख आलेले आहेत ते काही संज्ञानी ओळखले जातात. 'कुनाबीणी,बटको, पोरगे 'असे मराठे काळात अनेक कारणानी गुलामगिरीची निमिर्ती होत असत . त्यामध्ये

१.प्राचीन आणि मध्ययुगीन काळात अशी पध्दती होती की, यामध्ये कुनी पराभूत होतील त्याना पकडून गुलाम करणे, मराठे काळातही युध्दात सापडलेल्या लोकांना प्रामुख्याने स्त्रिला-मुलीना गुलाम बनवित असत. २. कर्जबाजारी पणा हे महत्वाचे कारण होते ३. दुष्काळ हे गुलामगिरीचे कारण होते ४. पेशवाईत बदआलम किंवा बदकर्मात सापडलेल्या स्त्रिस गुलाम केले जात असे पण हा नियम सर्व जातीतील स्त्रियाना नव्हता. शुद्र स्ि त्रलाच गुलाम केले जात असे ५. फुस लावून केलेले गूलाम ६. बक्षीस म्हणून दिलेले गूलाम असे विविध प्रकारच्या कारणामुळे गुलामगिरी स्विकारावी लागत असे.

**गुलामांचे हक्क:-** १. मालमत्ता करण्याचा व जमविण्याचा हक्क होता. २. गुलामांना कमविण्याचा व जमविण्याचा हक्क होता. व त्यामागे तो स्वताची सुटकाही करुन घेत असे . ३. गुलामास लग्न कराता येत नसे ४. शेती-जमीन करण्याचा हक्क होता.

**गुलामाचा व्यापार:-**गुलामाचा व्यापार मोङ्गया प्रमाणावर चालत असे पेशव्याच्या खाजगीकडे १९७ कुनबीनी असल्याचे संदर्भ सापडतात. पेशवाईत गुलामांची किंमत २० रु पासून ते २०० रु पर्यत असल्याची दिसते. गुलामाच्या व्यापारावर जकात लावला जात असे १३ आधुनिक काळात गुलामगिरी नष्ट झाली असली तरी अस्पृश्यता, गरीबी,दारिद्रय स्ि त्रयांना नाकारलेले हक्क या स्वरुपात काहीअंशी शिल्लक होती. परंतु राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले , महर्षी कर्वे , गांधी , आंबेडकरांनी गरीबाना व दीनदलीताना मानवी हक्क मिळवून दिले . भारतीय राज्यघटनेद्वारे या घटकांना विशेष आरक्षण-संरक्षण देऊन भारतीय समाज एक-संघ बनविला. आंतरराष्ट्रीय पातळीवरही 'युनो' सारख्या महासंघाने गुलामगिरीच्या विरोधात बरेच कायदे केले

## सन्दर्भ ग्रन्थ

१. देवराज चनाना, प्राचीन भारतीय गुलामगिरी, लोकवाङ:मय गृह, मुंबई,१९७८,पृ-२२ २. D.D. Kosambi, The Culture and Civilization of ancient India in Historical outline, London ,1965, P-78 ३. तत्रैव, पृ. ६० ४. देवराज चनाना, प्राचीन भारतीय गुलामगिरी, लोकवाङ:मय गृह, मुंबई,१९७८,पृ-२५ ५. तत्रैव, पृ. २६ ६. तत्रैव, पृ. ९४,९५,९६ ७. तत्रैव, पृ १५१,१५२ ८. डी एन झा, प्राचीन भारतीय इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय ,दिल्ली,१९८६ पृ.३३३,३३४ ९. तत्रैव, पृ. २०६,२०७ १०. देवराज चनाना, प्राचीन भारतीय गुलामगिरी, लोकवाङ:मय गृह, मुंबई,१९७८,पृ-१५२ ११. रोमिला थापर, प्राचीन भारतीय इतिहास,राजकमल प्रकाशन,नई दिल्ली,१९७५ पृ.२४१,२७० १२. डॉ. पी ए गवळी, मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लीकेशन,औरंगाबाद,१९९९ पृ.१७७ १३. तत्रैव, पृ.१७८.१८०